# वार्तापत्र

दिनांक १८/१०/२०१९

## अतिदुर्गम लाहेरी पंचक्रोशीतील नागरिकांचा नक्षलविरोधात एल्गार.

- **मतदानावर बहिष्कार घालण्यासाठी नक्षलवादयांनी लावलेल्या बॅनर्सची ग्रामस्थांनी केली होळी.**

उपविभाग भामरागड अंतर्गत येणा-या उप पोस्टे लाहेरी हद्दीतील मौजा लाहेरी, मौजा मलमपडुर, मौजा भुसेवाडा, मौजा कुकामेटा, मौजा लष्कर, मौजा आलदंडी व मौजा गोपणार या भागात नक्षलवादयांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बॅनर व पोस्टर्स व्दारे ग्रामस्थांना मतदानावर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले होते.

नक्षलवादयांनी केलेल्या या आवाहनास गावक-यांनी सडेतोड उत्तर दिले असुन पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी उत्स्फुर्तपणे एकत्र येत लोकशाहीवर विश्वास दाखवत नक्षलवादयांनी लावलेले बॅनर्स व पोस्टर्सची होळी केली. या वेळी पंचक्रोशीतील २०० ते ३०० नागरिक उपस्थित होते. गावक-यांनी नक्षलवाद मुर्दाबादच्या घोषणा दिल्या.

नक्षलवादी स्वत:च्या फायदयासाठी मतदानावर बहिष्कार घालण्याचे आवाहन करत असुन आम्ही आमच्या भागाच्या विकासाकरीता मतदान प्रक्रियेत सहभागी होवुन लोकशाही बळकट करण्यासाठी व आमच्या भविष्यासाठी मतदान करणार असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा॰ यांनी लाहेरी पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांचे अभिनंदन केले आहे. त्याचबरोबर इतर नागरिकांनी देखील या भागातील ग्रामस्थांप्रमाणे नक्षलवादयांचा विरोध करीत लोकशाहीच्या बळकटीसाठी मोठया प्रमाणावर घराबाहेर पडुन मतदान करण्याचे आवाहन मा. पोलीस अधीक्षकांनी केले आहे.

